# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 15/07/2015 (का.प.क्र.-03) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 15 जुलै 2015 रोजी (का.प.क्र.03) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त तथा अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे

श्री.गजानन बारवाल :औरंगाबाद शहराचे प्रसिध्द शायर बशर नवाज साहेब यांचा स्वर्गवास झालेला आहे. सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. त्याचप्रमाणे स.सदस्य यांचे वडील प्रकाश कोंडीराम एडके यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.विकास एडके :विरोधी पक्ष नेते श्री.अज्जू पहेलवान यांचे बंधूंचे दु:खद निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :अनुमोदन आहे.

श्री.मोहन मेघावाले :या सर्वांना श्रध्दांजली वाहण्यात यावी. यास अनुमोदन आहे.

मा.सभापती :शहरातील नावाजलेले प्रसिध्द उर्दु कवि बशीर नवाज साहेब, श्री.अज्जू पहेलवान यांचे बंधूं अन्वर खॉ तसेच स.सदस्य श्री.एडके यांचे वडील यांचे वडीलांचे नुकतेच निधन झालेले आहे या सर्वांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात येते.
(सभागृहातर्फे यावेळी दोन मिनिटं स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात येते.)

श्री.गजानन बारवाल :आजच्या सभेमध्ये कोणकोणते अधिकारी गैरहजर आहेत याबाबत माहिती देण्यात यावी. स.सभापती यांची परवानगी घेतलेली आहे का.

मा.सभापती :शहर अभियंता श्री.सखाराम पानझडे, सहा.संचालक नगर रचना श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्य.अभियंता श्री.हेमंत कोल्हे, श्री.फालक यांनी अनुपस्थित राहण्याबाबत परवानगी घेतलेली आहे. मा.अतिरिक्त आयुक्त खुलासा करतील.

| | |
|---|---|
| मा.अतिरिक्त आयुक्त | :कार्यालयीन कामाकरीता मा.आयुक्तांसमवेत सदरील अधिकारी गेलेले आहेत. मा.आयुक्त दौऱ्यावर गेले असतांना अतिरिक्त आयुक्त किंवा उपआयुक्त दर्जाचे अधिकारी बैठकीसाठी मा.आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन बसतात. |
| श्री.गजानन बारवाल | :मा.नगर सचिव यांचेकडुन खुलासा घ्यावा. |
| नगर सचिव | :सभेला मा.आयुक्त येणार नसेल किंवा अनुपस्थित असेल तर त्यांनी उपआयुक्त दर्जापेक्षा कमी नाही. अशा अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याची ॲक्टमध्ये तरतुद आहे. |
| श्री.गजानन बारवाल | :मा.आयुक्त महोदय यांनी तसे पत्र दिले आहे का? |
| श्री.रावसाहेब आमले | :मा.आयुक्तांना काही कामानिमित्त बाहेर जायचे असेल तर याबाबतचे पत्र मा.सभापती यांना द्यावे. असे माझे मत आहे जर दिले नसेल तर हा सभागृहाचा अवमान आहे. सभा तहकूब करण्यात यावी. |
| श्री.गजानन बारवाल | :सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. मा.आयुक्त महोदय यांनी मा.सभापती यांना संदेश देणे आवश्यक होते. कार्यालयीन कामानिमित्त मा.आयुक्तांना बाहेर जायचे असेल तर मा.सभापती यांना माहिती द्यायला पाहिजे. |
| श्री.मोहन मेघावाले | :सभागृहात शहराच्या समस्या बाबत चर्चा केली जाते. अधिकाऱ्यांनी सभेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिकारी नसल्याने सदरील सभा तहकूब करण्यात यावी. |
| श्री.गजानन बारवाल | :सभेत हजर राहणे संबधी पत्र दिलेले नाही. अनेक प्रश्न सभागृहात मांडले जातात त्याबाबचे समाधान कारक उत्तर अधिकारी देवु शकतात. |
| मा.अतिरिक्त आयुक्त | :मा.आयुक्त काही कारणामुळे सभेमध्ये हजर राहु न शकल्यास अतिरिक्त आयुक्त अथवा उपआयुक्त दर्जाचा अधिकारी मा.आयुक्तांच्या वतीने हजर राहतील. |
| श्री.गजानन बारवाल | :माहिती दिलेली नाही. हा सभागृहाचा अवमान आहे. |
| मा.सभापती | :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता अनुपस्थितबाबत जे नियम असतील त्या संदर्भांत खुलासा करावा. |
| नगर सचिव | :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 38 अन्वये शासनास वेळोवेळी स्थायी समितीच्या अनुमतीने, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी आयुक्ताला अनुपस्थिती रजा देता येईल. |
| मा.सभापती | : स्थायी समितीच्या अनुमतीने, अनुपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु सदरील बाब या ठिकाणी घडलेली नाही. त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात येते. तारीख व वेळ नंतर कळविण्यात येतील. यापुढे स्थायी समिती सभेला सर्व अधिकारी यांनी उपस्थित रहावे. याबाबत दक्षता घेण्यात यावी. |

**(महबूबखॉं पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद